दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र • शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक -८४ • पाने ४ • किंमत ४ रुपये

### मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची सांगोला येथे जाहीर सभा



सांगोला । प्रतिनिधी-राज्यात शिवसेना ,भारतीय जनता पार्टी ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष , रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रयत क्रांती संघटना या पक्षांची महायुती आहे. २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूल शेजारील पटांगण वासुद रोड सांगोला येथे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची विजयी संकल्प सभा आयोजित केली आहे. तरी या सभेसाठी सांगोला शहर व तालुक्यातील तसेच भाळवणी गटातील महायुतीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी व मतदार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे


# महायुतीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी

## देवेंद्र फडणवीसांचे डहाणूच्या सभेत मोठे आश्वासन

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डहाणू येथील सभेत बोलताना मोठे आश्वासन दिले आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले, तर शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी डहाणूच्या विकासाबाबतही भाष्य केले. वाढवण बंदरामुळे भूमिपुत्रांना रोजगार मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच डहाणूचा विकास करताना नैसर्गिक संपदा आणि जैवविविधतेवर गदा येणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

वाढवणच्या बंदरामुळे डहाणू भागाचे चित्र बदलेल. मासेमारी करणारे कोळी बांधवांवर कोणताही अन्याय होणार नाही. पण आहे त्यापेक्षा चांगली अवस्था आम्ही तुम्हाला आणून देऊ. हा देवाभाऊचा शब्द आहे. तुमच्या पारंपारिक व्यवसायाला नवी उंची कशी मिळेल. याची योजना आम्ही आखली आहे. त्यामुळे पुढील काळात कोळी बांधव समृद्ध झालेले पहायला मिळतील, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते डहाणू येथे प्रचार सभेत बोलत होते. अनेकांनी वाढवण बंदराला विरोध केला होता, असे म्हणत फडणवीसांनी विरोधकांवर निशाणा साधलाभगवान मिरडा मुंडांना मानणारे आम्ही आहोत. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरडा मुंडांची जयंती आहे. संपूर्ण भारतात ही १५० वी जयंती एक वर्षापर्यंत साजरी करणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले असल्याचे फडणवीस म्हणाले. भगवान बिरसा मुंडा यांची प्रेरणा घेऊन डहाणू आणि पालघरच्या आदिवासींचे जल, जंगल आणि जमीन कुणालाही घेऊ देणार नाही, असे आम्ही ठरवल्याचेही फडणवीस म्हणाले.फडणवीस म्हणाले, शहर वाढत आहे. शहरांच्या गरजा आणि लोकसंख्या वाढत आहे. विकासाची गरज आहे. मात्र, १९९१ च्या नोटिफिकेशनमुळे डहाणूचा विकास रखडल्याचे फडणवीस म्हणाले. आम्ही त्या नोटिफिकेशनच्या विरोधात नाहीत. त्यातील पर्यावरणवादी विषयाला आमचेही समर्थन आहे. पण, १९९१ आणि २०२४ मध्ये वस्तुस्थिती, नियम आणि टेक्नॉलॉजी बदलली आहे. त्यामुळे १९९१ च्या परिपत्रकामुळे डहाणूच जो विकास थांबला आहे, जीव गुदमरत आहे, त्यातून डहाणूला मोकळे करण्याचा आम्ही निर्णय घेतला असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.डहाणूचा विकास करताना येथील नैसर्गिक संपदा, जैवविविधता यांच्यावर कुठलाही डाग येऊ देणार नाही. सामान्य माणसाचे जीवन कसे सुकर करता येईल, असा आमचा प्रयत्न असेल. वाढवण बंदरामुळे १० लाख रोजगाराच्या संधी तयार होत आहेत. या संधी भूमिपुत्रांना मिळायला हव्यात, यासाठी भूमिपुत्रांचे स्कील डेव्हलपमेंट करण्याचे काम सुरू केले आहे. येत्या काळात भूमिपुत्रांच्या हाताला काम दिले जाणार असल्याचेही फडणवीस म्हणाले.



### पालघरला विमानतळ बांधणार

आशियातील सर्वात मोठे बंदर डहाणूमध्ये होणार आहे. बुलेट ट्रेन या भागातून जाणार आहे. मुंबईचा कोस्टल रोड देखील विरारपर्यंत आणतो आहोत. नरीमन पॉईंटपासून विरारपर्यंत केवळ ३५ ते ४० मिनिटांत येता येईल. या कोस्टल रोडसाठी जपानमध्ये गेलो होतो. जपानमधील सरकारने ५४ हजार कोटी रुपये देण्याची कबुली दिली. त्यामुळे मुंबई पालघरला जोडले जात आहे. एकीकडे रस्ता, दुसरीकडे रेल्वे, तिसरीकडे बंदर आहे. आता फक्त विमानतळाची कमतरता आहे. आता या भागात नवीन विमानतळ देखील बांधणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तशी घोषणा केली आहे.

## रांजणी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांचा प्रचार



**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांचा प्रचार जोरात सुरु असून त्यांचा प्रचाराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. गुरुवारी रांजणी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांचा प्रचार करण्यात आला. या प्रचारात शेतकरी कर्जमाफी, महालक्ष्मी योजनेसह राजेशभैय्या टोपे यांनी केलेल्या विविध विकास कामांचे नागरिकांनी स्वागत केले.

यावेळी आबासाहेब वरखडे, सरपंच अमोलभाऊ देशमुख, बळवंत देशमुख, सय्यद रशीद अली, शामराव देशमुख, भगवान इंगळे, दिपक वरखडे, धनंजय देशमुख, हमजा कुरेशी, रमण जाधव, कैलास वरखडे, प्रितम वरखडे, शिवाजी पाटोळे, मोईन बेग, बशीर कुरेशी, तुकाराम वनगुजरे, दगडू भालेकर, इरफान तांबोळी, सय्यद अख्तर, मोईन तांबोळी, इरफान शेख, डॉ अनिकेत वरखडे, अनिल काळे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पैठण वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.संदीप जाधव तर सचिव पदी ॲड.सुभाष खडसन यांची निवड

**विहामांडवा । प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील सन २०२४-२०२५ या वर्षासाठी झालेल्या वकील संघाची निवडणुक पैठण वकील संघाच्या इतिहासात प्रथमच लोकशाही पद्धतीने व अतिषय खेळीमेळीच्या वाता पार पडली. या वकील संघाच्या निवडणूकीमध्ये वकील संघाच्या अध्यक्ष पदी ड संदीप जाधव,उपाध्यक्ष पदी ड.वैभव चव्हाण, तर सचिव पदी ड.सुभाष खडसन,सहसचिव पदी ड.इम्रान शेख, कोषाध्यक्ष पदी ड.स्वप्नील उगले, ग्रंथपाल पदी ड.उध्दव नजन, महिला प्रतिनिधी ड.आसमा खानापुरे/बागवान, सदस्य पदी ड.संदीप नाडे,



ड.रमेश गव्हाणे यांची निवड करण्यात आली. वकील संघाच्यानिवडणुकीमधे निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून ड.एकनाथ नलावडे, ड.ड. राजेंद्र गोर्डे, ड राहुल धायकर यांनी काम पाहिले. त्यांना सहकार्य ॲड.हेमंत कडेठानकर व ॲड. हनुमान फुंदे यांनी केले.या ऐतीहासीक निवडणुकीत निवडून आलेल्या नव निर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष, सचिव व सर्व सदस्यांचे स्वागत वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. शकील बागवान ॲड.सि.आर कुलकर्णी, ॲड.पि.एन. काकडे, ड.आशोक शेवतेकर, ड.फटांगडे मामा, ड.आर.एस.वाव्हळ,ड.वैदय,ड.आकाश जगताप ड.विकास नरवडे,ड.राहूल तुपे, ड.अनिल जोशी, ड. सय्यद, ड.अजहर इनामदार,ड.आजिनाथ सानप,ड.सदाशिव जाधव,ड.कमलताई चव्हाण, ड.धनंजय चव्हाण, गणेश जगदाळे, विशाल बुरकूले, आदींनी केले.

## परतूर व घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील स्ट्रॉंगरूमची निवडणूक निरीक्षक श्री.नवीन यांच्याकडून पाहणी




**जालना/असलम कुरेशी**

भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक श्री. नवीन यांनी जिल्ह्यातील ९९-परतूर विधानसभा मतदारसंघ आणि १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील स्ट्रॉंगरूमला भेट देऊन पाहणी करत विविध सूचना केल्या.

यावेळी अंबा-परतूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील स्ट्रॉंगरूम पाहणीच्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. निवडणूक निरीक्षक श्री. नवीन यांनी विधानसभा निवडणूकीत मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या मतदान यंत्राची व साहित्याची सिलिंग कर्मचारी करत असताना प्रत्यक्ष टेबलावर जाऊन कामाची पाहणी करून योग्य त्या सूचना दिल्या.

घनसावंगी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील स्ट्रॉंगरूम पाहणी करताना निवडणूक निरीक्षक श्री.नवीन यांच्यासह जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, प्रशिक्षणार्थी आयएएस श्री. अरुण, निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी मतदान यंत्रावर प्रत्यक्ष मतदान करून मतदान यंत्र सुस्थितीत असल्याची खात्री काही कर्मचारी करत असताना निवडणूक निरीक्षक श्री.नवीन आणि जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी प्रत्यक्ष टेबलवर जाऊन मॉकपोल करत व्हीव्हीपॅट मधील दिसणाऱ्या उमेदवारांच्या चिन्हांची पडताळणी केली. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती दांडगे यांच्याकडून निवडणूक विषयक कामाचा आढावा घेतला.



संपादकीय

# आनंदमास



'सावन का महिना पवन करे सोर, जियरा रे झूमे ऐसे ,जैसे बनमा नाचे मोर ' १९६७ मध्ये रिलीज झालेलं मिलन चित्रपटातलं हे गीत श्रावणाच्या देखाव्याची खरी अनुभूती देतं. निसर्गाचं मनमोहक रूप आणि मराठी सणांची आरास असलेला श्रावणमास !! निसर्गाच्या सृजनाचे राजेपद सांभाळत, माहेरवाशीणींना व्रत- वैकल्यात गुंतवून टाकणारा , सणांनी आपापसातील कटूता काढून टाकणारा हा महिना आनंदाची बीजे चित्तवृत्तीत पेरून जातो. निसर्गाने स्वतः भोवती पांघरलेली हिरवीगार शाल , ऊन पावसाशी चालवलेला खेळ, पांढ-या शुभ्र , स्वच्छ, खळाळत्या धबधब्यात न्हाऊन निघणारा डोंगर , डेरेदार झाडाला बांधलेले सुगरणीचे खोपे आणि पारंब्यांना टांगलेले झुले हे श्रावणाचं रूप गावोगावी पहायला मिळतं .आणि पृथ्वीवरील हिरव्या स्वर्गाची अनुभूती येते. लालचुटूक तेरडा , धायरीची तांबूस फुले , विविध रंगी रानफुले , अनेक विध फळे, अनेक खनिजांनी युक्त कंटोर्ली, भोकर , अळू अशा अनेक रानभाज्या असा रानमेवा, पक्ष्यांचा किलबिलाट, श्रावण आपल्या समोर ठेवतो आणि या सा-यामुळे निसर्गाचे हे जणू अनोखे रंगसंमेलनच भासते.

निसर्गाच्या या आविष्काराला विविध सणांची सोबत असते.श्रावणाची सुरवात होते ती नागपंचमीने .शेतीचे रक्षण करून शेतकऱ्यालाही मदत करणा-या नागाचे पूजन हे या सणाचे महत्त्व आहे.यानंतर सारे कोळी बांधव आपल्या व्यवसायाची सुरवात करण्यास सज्ज होतात. समुद्राला नारळ अर्पण करून त्याला शांत करणारा नारळी पौर्णिमेचा सण यानंतर येतो .याचवेळी बहिण- भावाच्या नात्याची वीण अधिक घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण असतो.बालकृष्णाच्या बालक्रीडा दाखवणारा , बालगोपालांचा लाडका दहीकालेचा उत्सव मुलांचा आवडता. विवाहित स्त्रीया याच महिन्यात मंगळागौर पूजतात, दर सोमवारी भगवान शंकराला शिवामूठ वाहतात. मंगळागौरीच्या सणासाठी खास वेशभूषा करून , केशभूषा करून ,दागदागिने लेऊन माहेरवाशीणी सणांच्या निमित्ताने माहेरी येतात.आपली सारी सुख - दुःखे आपल्या आई, बहिणी, भावांशी हितगुज करत मनमोकळेपणाने सांगतात.आपल्या दुःखावर मायेची फुंकर घेऊन , आपल्या सासरच्या माणसांचे कोडकौतुक करून सा-या सणांत समरस होतात.श्रावण मासात निसर्ग भरभरून देत असतो त्यामुळे सारे पशु - पक्षीही आनंदात असतात.कुरणे वनी बागडत असतात.बगळ्यांची माळ काळ्या नभाला सुशोभित करते.दुथडी भरून वाहणारी नदी पाणीटंचाईचे सावट दूर करते.एकूणच वातावरण प्रसन्न असते. या वातावरण आपल्याला मात्र वाट्टेल तसे , वाट्टेल तेव्हा , तेलकट, तामसी खाऊन चालत नाही त्यामुळे आजाराबाबत श्रावणमासानेच काही मर्यादा घातल्या आहेत.यातील अनेक व्रतवैकल्यांचे शास्त्र समजून घेणे आवश्यक आहे .आपल्या पोटाला पचेल इतकाच आहारा व शक्यतो शाकाहार या काळात असावा असे शास्त्र सांगते.व्रतवैकल्यांमागे शरीराला आवश्यक असणारे लंघन असावे हा मुलभूत हेतू आहे.या मुळे शिस्त , संयम ह्या गोष्टींचेही आपल्यावर नकळत संस्कार होतात .सर्वामागील विज्ञान आपण समजून घेतले तर श्रावण अधिक आनंद देईल यात तिळमात्र शंका नाही. श्रावणाचे माहात्म्य अनेक कवी ,कवयित्रींनी आपल्या साहित्यातून विशद केले आहे .बालकवींची श्रावणमास कविता , असा रंगारी श्रावण ही ऐश्वर्य पाटेकर यांची कविता श्रावणाचे चपखल वर्णन करणारी आहे.निसर्ग भ्रमंती, ट्रेकिंगसाठी,पावसाळी सहलीसाठी श्रावणमास परफेक्ट आहे असं म्हणायला काहीच हरकत नाही.निसर्गाच्या सानिध्यात जेथे पाहू तेथे फोटोजनिक व्ह्यू असतात.सेल्फीकाढून , फोटो काढून बॅटरी फूल होते, डिपी ठेवायला खूप फोटोंचं कलेक्शन मिळतं .आषाढात प्रचंड पाऊस कधीकधी आपल्या बेतावर पाणी पाडू शकतो पण श्रावणातील पाऊस सहल खूप आनंद देऊन जातो .म्हणूनच श्रावणाचे वर्णन नेमके काय करावे ? धार्मिक, अध्यात्मिक , हृदयस्पर्शी, निसर्गरम्य वा एकात्मिक? खरं तरं मानवी जीवनाला आशावादी दृष्टिकोन देणारा श्रावण हे परमेश्वराने दिलेले वरदान आहे आणि दरवर्षी मिळणारे आहे.मनाची मरगळ दूर करणारा , झाडापानांना चमकदार करणारा , पवित्र, धार्मिक असा श्रावण. उपासाच्या पदार्थांनी तृप्त ढेकर द्यायला लावणारा असा हा श्रावण .वर्णन करायला शब्द अपुरे पडतील असा हा श्रावण .

श्रावणराजा तू अद्भुतकिमयागार ।
हरित तृणांनी सजली वसुधा नटूनी हिरवीगार ।
ललनाही झाल्या प्रसन्न पहा तुझ्या या रूपांनी ।
श्रावणमासाचे हे गीत गुंफीले या शब्दांनी ।


# झोपडपट्टीमुक्तीच्या वल्गना



'माणसाला नेमकी किती जमीन लागते?' ही लिओ टॉलस्टॉयची लघुकथा प्रसिद्ध आहे. सुमारे दीडशे वर्षानंतरही या कथेचे सार आणि प्रश्नाचे मर्म आपल्याला उमगलेले नाही. त्याचप्रमाणे मुंबईसारखी शहरे झोपडपट्टीपासून मुक्त होण्यासाठी नेमकी किती जमीन लागेल, बिल्डरांना किती भूखंड लागेल आणि राजकारणी-नोकरशाही यांना जमिनींच्या विकासापोटी किती मलिदा द्यावा लागेल, या प्रश्नांची उत्तरेही आज कुणाला ठाऊक नाहीत. मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याची आणि त्यासाठी बिल्डरांना जमीन आंदण देऊन त्यांच्यामार्फत ४० लाख झोपडीवासियांना मोफत घरे देण्याची योजना १९९५ साली घोषित करण्यात आली. त्यास आता तीन दशके उलटूनही झोपडीमुक्त मुंबईची घोषणा ही केवळ वल्गनाच ठरली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या योजनेतील सावळागोंधळाची गांभीर्याने दखल घेतली असून मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठास मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनाची झाडाझडती घेण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधार, निर्मूलन व पुनर्बांधणी हा कायदा १९७१ पासून राज्यात अस्तित्वात आहे. मुंबई उच्च न्यायालयातर्फे आता या कायद्याची अंमलबजावणी नेमकी किती प्रभावीपणे झाली आहे, त्यातून काय साध्य झाले आहे व त्यात किती गैरप्रकार झाले आहेत, याची तपासणी होणार आहे. खरे तर गेल्या ५० वर्षांत झोपडपट्टी सुधार आणि निर्मूलन याबाबत काय झाले, याचा वेळोवेळी आलेल्या सरकारांनी आढावा घेण्याची गरज होती. ते काम न्यायालयाला हाती घ्यावे लागत आहे, यासारखी शरमेची गोष्ट नाही. कोणत्याच सरकारला किंवा गृहनिर्माण विभाग, सनदी अधिकारी यांनाही अशी गरजच कधी वाटली नाही, याचे कारण उघड आहे. झोपडपट्ट्यांकडे गोरगरिबांच्या निवाऱ्यापेक्षा मतपेट्या म्हणूनच राजकारण्यांनी कायम पाहिले. झोपडीवासियांना पर्यायी घरे देतांना नव्याने झोपड्या उभ्या राहू नयेत, यासाठी १९९५ पर्यंतच्या झोपड्या अधिकृत मानण्याची मर्यादाही ठेवण्यात आली होती. मात्र, लोकप्रतिनिधींच्या रेट्यातून ही मर्यादा २००० सालापर्यंत वाढली. १४ फुटांपर्यंत झोपड्यांना परवानगी देण्याची धोरणे सभागृहांमध्ये मंजूर होते, तेव्हा प्रत्यक्षात झोपड्यांची उंची मात्र त्यापेक्षा तिप्पट झालेली असायची. काही ठिकाणी व्यापारी धंदे चालायचे. मात्र, महापालिका, जिल्हाधिकारी तसेच केंद्र सरकारचे विविध विभाग, ज्यांचे ज्यांचे भूखंड झोपड्यांनी व्यापले होते, त्यांच्या यंत्रणांनी या गोष्टींकडे पूर्णतः डोळेझाक केली.झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी मध्यस्थ म्हणून स्थानिक राजकीय गुंडापुंडांची नवी फळी उदयास आली. गटातटांमध्ये समेट घडवून इच्छुक बिल्डरला शिरकाव करून देण्याची गुरूकिल्ली या लोकांकडे होती. हेच पुढे प्रवर्तक, विकासक म्हणून मिरवू लागले. आलिशान मोटारींनी त्यांचे फॉर्च्युन फळफळले, परंतु झोपडीवासियांचे व शहराचे राहणीमान काही सुधारले नाही. २०११ मधील जनगणनेनुसारही मुंबईतील २४ टक्के भूभाग झोपड्यांनी व्यापलेला होता आणि सुमारे ४८ टक्के जनता झोपड्यांमध्ये राहात होती. एसआरएच्या इमारती ही राहणीमानाच्या दृष्टीनेही दूषणेच ठरली. कधी बिल्डरने कॉर्पस बुडविला म्हणून तर कधी रहिवाशांनी मासिक हिस्सा थकविला म्हणून, या इमारतींची लिफ्ट बंद असणे, वीज कापली जाणे, पाण्याचा खडखडाट अशी परिस्थिती रहिवाशांवर आली. कित्येक प्रकल्प वीस वीस वर्षे केवळ रखडलेले व रहिवासी संक्रमण शिबिरांमध्ये खितपत पडलेले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही यंत्रणा तर एक नवे कुरण ठरली.पुनर्विकसित इमारतीत घरे मिळाल्यावर दहा वर्षे ते विकता येणार नाही, ही अट झोपडीवासियांना मोफत घरे देतांना होती. मात्र त्यास कित्येक ठिकाणी हरताळ फासण्यात आला. घरे विकून लोक पुन्हा झोपडीत गेले. या प्रकारांवर उच्च न्यायालयाने अनेकदा कोरडे ओढले. परंतु सरकारांनी या हस्तांतरणाच्या अटी काढण्याचाच कल दाखविला. म्हणजे झोपड्यानिर्मूलनाच्या हेतूलाच हरताळ फासला गेला. गोरगरीब व कष्टकऱ्यांना स्वस्तात छप्पर मिळाले पाहिजे, हा उद्देश योग्यच. शिवाय, टोलेजंग गगनचुंबी टॉवरना भूखंड देऊन त्याबदल्यात त्यांनी गरिबांसाठी मोफत घरे बांधणे हे आवश्यकही ठरते. परंतु याचा अर्थ टॉवरवाल्यांनी झोपड्यांच्या जिवावर कमवायचे, झोपडीदादांनी हतबल कष्टकऱ्यांच्या आणि अतिक्रमितांनी करदात्यांच्या, असाही होत नाही. या प्रकारांना आळा बसायला हवा. जे मॉडेल मुंबईत राबविले जाते, तेच राज्यभर अस्तित्वात येते. जगातील सर्वांत मोठी झोपडपट्टी आमच्याकडे, असा टेंभा आपण किती काळ मिरवत राहायचा? विदेशातील पर्यटकांचे झोपडपट्टी पर्यटन हेच आपले आकर्षण ठरणे भूषणावह नाही. प्रत्येक निवडणुकीत आजही झोपडीमुक्त मुंबई ही घोषणा द्यावी लागते, हे नगरसेवकांपासून खासदारांपर्यंत आणि सनदी-सरकारी अधिकारी, पोलिस या सर्वांचे अपयश आहे. न्यायालयाच्या दणक्याने तरी या बजबजपुरीतून मुंबापुरीची सुटका व्हावी.

# स्वागतार्ह 'लेझर'बंदी



पुण्याच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझर किरणांचा वापर करण्यावर बंदी घालण्याचा पुणे पोलिस आयुक्तांचा निर्णय स्वागतार्ह आणि अनुकरणीय आहे. राज्यातील अन्य शहरांनीही हा कित्ता गिरवायला हवा. खरे तर राज्य सरकारनेच उत्सवांमधील लेझरबंदीबाबत व्यापक निर्णय घ्यायला हवा. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सवातील, विशेषतः मिरवणुकांतील लेझर किरणांचा वाढता वापर अनेकांच्या डोळ्यांना घातक इजा करतो आहे. गेल्या वर्षी पुण्यासह काही शहरांत लेझरमुळे डोळ्यांना गंभीर इजा झाल्याची प्रकरणे घडली. डोळ्यांसारख्या नाजूक अवयवाला अपायकारक ठरणाऱ्या घटकांचा वापर तातडीने थांबविण्यासाठी पुण्यातील नागरिक आग्रही होते. 'महाराष्ट्र टाइम्स'नेही याबाबत पुढाकार घेतला होता आणि यंदाच्या गणेशोत्सवाची चाहूल लागताच हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणला. पुण्यातील या वर्षीच्या गणेशोत्सवाबाबत गणेश मंडळांबरोबरील बैठकीत हा मुद्दा चर्चिला गेला आणि पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी लेझरबंदीचा निर्णय जाहीर केला. ही बंदी धुडकावून लेझरचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे. या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल हे पाहावे लागेल. त्याची जबाबदारी पोलिसांवर आहेच; परंतु गणेश मंडळांच्या कर्त्याधर्त्यांवरही आहे. उत्सव सुरू होण्याच्या आधी अनेक आश्वासने देऊन, आणाभाका घेऊन प्रत्यक्ष उत्सवात त्यांपैकी कशाचीही अंमलबजावणी होत नाही, असा पुणेकरांचा अनुभव आहे. ना ढोल-ताशा पथकांची संख्या कमी होते; ना मिरवणूक लवकर संपते. दरवर्षी तेच ते होते. लेझरवरील बंदीही अशाच प्रकारची असेल, तर त्याचा काही उपयोग होणार नाही.

गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव असला, तरी त्याला सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कंगोरे आहेत. हा सार्वजनिक उत्सव सुरू करण्याच्या प्रेरणा स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित असल्या, तरी समाजमनाला आकार देण्यात, त्याची सांस्कृतिक जडणघडण करण्यात आणि स्थानिक पातळीवरील नवीन नेतृत्व निर्माण करण्यात गणेशोत्सवाचे मोठेच योगदान आहे. अशा उत्सवात काळानुरूप बदल होणे स्वाभाविकच; परंतु दुर्दैवाने त्याला काही वर्षांत उन्मादी स्वरूप येत गेले. ध्वनिवर्धकांच्या उंच भिंती उभारून कर्णकर्कश आवाजात गाणी वाजविण्याने आणि लेझर किरणांच्या भडीमारात बीभत्स नृत्यांनी उत्सवाला विकृत केले; मात्र गणेशोत्सव ही कार्यकर्ते घडविणारी शाळा मानली गेल्याने आणि मतपेढीच्या राजकारणासाठी त्याचा उपयोग होत असल्याने नेतेमंडळींनीही या विकृतीला हातभार लावला. त्यामुळे ही विकृती म्हणजे गणेशोत्सवाचे जणू वैशिष्ट्यच बनत गेली. अशा अनेक विकृती उत्सवात शिरल्या असल्या, तरी त्यांकडे राजकीय नेते चिकित्सकपणे पाहत नाहीत. उलट, याकडे बोट दाखविणाऱ्यांचीच तोंडे बंद करण्याचा प्रयत्न होतो. 'हा लोकांचा उत्सव आहे, तो त्यांना हवा तसा साजरा करू द्या,' असे म्हणून उत्सवाला दणदणाटी, कंठाळी स्वरूप देणाऱ्यांना पाठीशी घातले जाते. ध्वनिवर्धकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने रात्री दहापर्यंतची वेळ दिली असली, तरी गणेशोत्सवात त्याला काही दिवस सवलत देण्याची स्पर्धाच नेत्यांमध्ये लागली. उत्सवाच्या काळात कायदा पायदळी तुडविणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी दाखल केलेले गुन्हेही मागे घेण्याचीही स्पर्धा निर्माण झाली. यामुळे गणेशोत्सवात काहीही केले तरी चालते, अशी निर्नायकी स्थिती निर्माण झाली. अशा स्थितीत उत्सवाला वळण लावणे आणि नियमन करणे आणखी आव्हानात्मक बनले आहे. लेझरबंदीचा निर्णय या पार्श्वभूमीवर झाला आहे.

हे विधानसभा निवडणुकीचे वर्ष आहे. सर्व 'भावी आमदार' गणेशोत्सवाचा धडाका वाढविणार यात शंका नाही. त्याची झलक आजच दिसते आहे. गेल्या काही वर्षांपासून पुण्यासह राज्यातील गणेशोत्सवात ढोल-ताशा यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा वाढलेला वापर ही खरे तर चांगली गोष्ट म्हणायला हवी. मात्र, त्याचाही अतिरेक होऊन चालणार नाही. उत्सवाच्या दीड-दोन महिने आधीच पुण्यात नदीकाठी आणि मोकळ्या मैदानांत संध्याकाळी ढोल-ताशांचा आवाज घुमू लागतो. वादकांसाठी हा सराव महत्त्वाचा असला, तरी त्या-त्या भागांतील ज्येष्ठांना, मुलांना या आवाजाचा त्रास होतो. कर्णबधीरता येण्यापासून हृदयविकारापर्यंतचे धोके त्यातून उद्भवतात. याचाही विचार करून सरावाच्या जागांचे नियमन व्हायला हवे. विसर्जन मिरवणुकीत या पथकांच्या संख्येपासून त्यांच्या वादनाची वेळ निश्चित करण्यापर्यंत अनेक मुद्दे पोलिस आयुक्तांच्या बैठकीत मांडले गेले. या सर्व मुद्द्यांची अंमलबजावणी व्हायला हवी. मुंबई, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर यांसह राज्यातील अन्य प्रमुख शहरांत गणेशोत्सवाबाबत अशी भूमिका घेऊन ती प्रत्यक्षात आणली जावी. बुद्धीची देवता असलेल्या आणि मांगल्याचे प्रतीक असलेल्या गणेशाच्या उत्सवाला अधिक चांगले आणि नेटके स्वरूप देणे ही सरकारबरोबरच समाजाचीही जबाबदारी आहे.

# शहाणपणाची माघार

प्रस्तावित प्रसारण सेवा नियमन विधेयकाचा मसुदा मागे घेऊन केंद्र सरकारने योग्य निर्णय घेतला आहे. हा मसुदा गेल्या वर्षी तयार झाल्यापासूनच त्याविषयी अनेक शंका-कुशंका विचारल्या जात होत्या. त्यातील अनेक तरतुदींविषयी नाराजी होती. आता सरकारने पुन्हा नवा मसुदा तयार करून तो विचारार्थ सादर करण्याचे ठरविले आहे. टीका आणि आक्षेपांनंतर केंद्र सरकारने ही संवेदनशीलता दाखविली, हे योग्य झाले आहे. ही माघार शहाणपणाची आहे. भारतात १९९५ मध्ये झालेल्या केबल कायद्याने सर्व आधुनिक माध्यमांचे नियमन सध्या होते. या कायद्याला तीस वर्षे होतील. या काळात मनोरंजन, प्रक्षेपण, प्रसारण, दूरसंचार यांचे विश्व प्रत्यक्ष तंत्रसामग्री, प्रक्षेपणाचे तंत्रज्ञान आणि या माध्यमांमधून प्रसारित होणारा मजकूर किंवा कलात्मक आविष्कार अशा सर्व अंगांनी पूर्ण बदलून गेले आहे. ओटीटी म्हणजे 'ओव्हर द टॉप' या तंत्रसुविधेमुळे माहिती आणि मनोरंजनाचे नवे विश्व साकारले. ओटीटी ही मुळात व्हिडिओ स्ट्रिमिंग सर्व्हिस असते. तिला इंटरनेटची सुविधा आणि मोबाईल फोनपासून लॅपटॉपपर्यंत कोणतेही साधन पुरेसे असते. ही कमालीची सुटसुटीत, ग्राहकांना हवे ते देणारी, वेगवान आणि निर्बंधमुक्त सुविधा आहे. अमेरिकेत जन्म झाल्यावर तिने सगळे जग पादाक्रांत केले. भारतात आज या व्यवसायाचा व्याप किमान दहा हजार कोटी रुपयांचा असेल. चीनमध्ये तो एक लाख कोटी रुपयांचा आहे. भारतात उद्या काय होईल, याचा यावरून अंदाज यावा. हे सगळे विस्तारित विश्व नियंत्रित व्हावे, अशी सरकारची नव्या कायद्याचे प्रारूप मांडताना कल्पना होती. मात्र, ओटीटीसहित सर्वच स्वतंत्र माध्यमांवर नव्या कायद्याने अनावश्यक नियंत्रण येईल, तेव्हाच सुरू झाली. त्या तक्रारीत तथ्यही होते.

आज लोकप्रिय ओटीटी फलाटांची संख्या दहाच्या घरात आहे. ती वाढत राहणार. जाहिरातींसहित मजकूर किंवा सामग्री मोफत पुरविणे, विशिष्ट कार्यक्रम तितकेच पैसे घेऊन देणे किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मचा वर्गणीदार बनवून सेवा देणे.. अशा तीन प्रकारे ही सेवा सध्या मिळते. मात्र, या सगळ्यात ग्राहकांच्या पुढ्यात येऊन पडणाऱ्या सामग्री म्हणजे कंटेंटवर कोणत्याही पातळीवर ठोस नियंत्रण नाही. ते आणताना नव्या भारतीय न्याय संहितेच्या चौकटीत (बीएनएस) जे येणार नाही; अशा कंटेट किंवा मजकुराचे नियमन कसे करायचे, याचा आता नव्याने विचार करावा लागेल. गेल्या वर्षी या कायद्याचा प्रस्ताव आला तेव्हा 'कंटेंट इव्हॅल्यूशन कमिटी' म्हणजे 'मजकूर मूल्यमापन समिती' नेमण्याची कल्पना त्यात होती. या समितीत विविध प्रकारचे माध्यम तज्ज्ञ आणि अधिकारी असतील, असे म्हटले होते. आता सरकार कायद्याचा नवा मसुदा करताना या समितीला अधिक स्वायत्तता देते का आणि सरकारी नियंत्रणापेक्षा तिचा प्रत्यक्ष कारभार या विषयातील तज्ज्ञांकडे सोपविण्यास तयार होते का, याची उत्सुकता आहे. या समितीला जुनी पठडी सोडून नवी तंत्राधारित, वेगवान कार्यपद्धती स्वीकारावी लागेल. तशा नेमक्या सूचना या व्यवसायातली मंडळी आता कशा पुढे आणतात, हे पाहावे लागेल.दुसऱ्या मोदी सरकारने या विधेयकाचा मसुदा प्रसारित केला तेव्हाची आणि आजची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. मात्र, हा विषय संवेदनशील असल्याने विरोधकांनी त्याची गुणात्मक पारख करण्याची गरज आहे. नवा कडक कायदा असेल तर सरकारी हस्तक्षेपाची जशी भीती आहे; तितकीच भीती आज समाजमाध्यमांत किंवा ओटीटी फलाटांमध्ये चित्रित होणाऱ्या हिंस्र, बीभत्स, नृशंस आणि अर्थहीन कंटेंटचीही आहे. उद्या कोणतेही सरकार आले तरी त्याला गेल्या तीन दशकांत बदलून गेलेल्या या क्षेत्राचे नियमन कसे करायचे, याचा गंभीर विचार करावाच लागेल. डिजिटल तंत्रज्ञानाला आणि प्रक्षेपणाला देशांच्या सीमा समजत नसल्या तरी भारतासारख्या व्यामिश्र देशात ही सगळी तंत्रसाधने मोकाट सुटणेही अपेक्षित नाही. ओटीटीवर येणाऱ्या मालिकांची कंठाळी कथानके, बीभत्स चित्रण आणि अश्लीलता यांच्याविषयी कायम तक्रारींचा पाऊस पडत असतो. हे सारे परदेशात तयार होते आणि इथे दिसते, असेही नाही. अनेक भारतीय निर्माते आणि दिग्दर्शकही अर्थहीन कथानकांच्या अश्लील व हिंस्र मालिका बनवतात. त्यांच्यावर योग्य अंकुश ठेवायचा पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होऊ द्यायचा नाही; अशी ही तारेवरची कसरत आहे. केंद्र सरकारने आता एक पाऊल मागे घेतल्यानंतर मनोरंजन उद्योग, कायदेतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व एकूण सुशील समाज यांनी सरकारला योग्य त्या सूचना कराव्यात. तारतम्याचा तोल जाऊ न देता या महाकाय प्रतिमासृष्टीचे उचित नियमन करणे आवश्यकच आहे.

# काँग्रेस आणि महाविकास आघाडीला या निवडणुकीत धडा शिकवा-सुजात आंबेडकर



**नायगांव । हानुमंत चंदनकर**

बाळासाहेब आंबेडकरांनी आजपर्यंत वंचितांना संरक्षण देण्याच काम केले आहे. पण बाळासाहेबांच्या आजारपणाच राजकारण करण्यात येत आहे. निवडणुकीच्या तोंडावर बाळासाहेब आय सी यु मध्ये बसून भावनिक वातावरण निर्माण करुन मते मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचाही काहीजन आरोप करत आहेत. एखाद्या व्यक्ती आयसीयु मध्ये अॅडमिट असतांना काँग्रेस आणि महाविकास आघाडीवाले वाईट चिंतत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत यांना धडा शिकवायचा आहे असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले आहे.

वंचित बहूजन आघाडीचे नांदेड लोकसभेचे उमेदवार अविनाश भोसीकर आणि नायगाव विधानसभेचे उमेदवार डॉ. माधव विभुते यांच्या प्रचारार्थ नायगाव येथील अंबिका मंगल कार्यालयात दि. १३ रोजी जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती.

पुढे बोलताना सुजात आंबेडकर म्हणाले की लवकरच बाळासाहेब मैदानात उतरून मँथेरान सभा घेतील पण आजारपणाच राजकारण करुन ज्यांनी ज्यांनी नावे बोटे ठेवली त्यांच्याविरुद्ध वंचितचे तरुण पेटून उठतील. आमचा तरुण एकदा का पेटून उठला ना यांना महाराष्ट्र तोंड लपवायला जागा मिळणार नसल्याची खरमरीत टिका केली. जसे आजारपणाचे वाईट राजकारण करण्यात आले तसेच आजपर्यंत या लोकांनी आंबेडकर वाद संपवण्याचा प्रयत्न केला, षडयंत्र करुन बाबासाहेब, भैय्यासाहेब, बाळासाहेब आनंदराज साहेबांना पाडण्याचा प्रयत्न केला असा आरोपही सुजात आंबेडकरांनी केला. राज्यातील प्रस्थापित पक्षांनी नेहमीच वंचित बदल चुकीचे राजकारण करत आले आहेत. अशा परिस्थितीत आम्ही स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला कि काँग्रेसवाले आपल्याला भाजपची 'बी' टिम म्हणतात ते आपापसात लढले की मैत्रीपुर्ण लढत ठरते. यावरुन प्रस्थापित पक्ष हे फक्त जातीयवादी राजकारण करतात. आम्हाला एकीकडे 'बि' टिम म्हणताना नांदेड जिल्ह्यातील दोन भाऊ निवडणुकीच्या मैदानात आहेत तर दुसरीकडे भाजपच उमेदवारांचे व्यवसायीक भागीदार खतगावकर आणि अशोकराव चव्हाणांचे नातेवाईक खतगावकर ये रिश्ता क्या कहलाता म्हणून हे प्रस्थापित नात्यगोत्यांचे राजकारण करतात त्यामुळे वंचित जागे झाले पाहीजे आणि या निवडणुकीत त्यांना धडा शिकवतांना वंचित बहूजन आघाडीचे लोकसभा उमेदवार अविनाश भोसीकर व नायगाव विधानसभा निवडणुकीच्या मैदानात असलेले उमेदवार डॉ माधव विभुते यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. या सभेला वंचितचे युवा प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुका निरीक्षक भीमराव बेंद्रीकर, जिल्हा सदस्या करुणाताई खंडेलोटे, धर्माबाद तालुका अध्यक्ष माधव जिंकले, अकबर शेख, नायगाव तालुका अध्यक्ष साहेबराव कोपरेकर, नायगाव तालुका उपाध्यक्ष सतीश वाघमारे, नायगाव तालुका उपाध्यक्ष प्रभाकर घंटेवाड, धम्मानंद सोनकांबळे, विलास वाघमारे, युवा जिल्हा सचिव बालाजी गायकवाड सहसचिव बाळासाहेब सोनकांबळे, माधव इंगळे, राहुल सोनकांबळे, धम्मानंद जोंधळे, ऋषिकेश धनवाडे, राजीव राचोटकर, शिवाजी पवार, राहुल गायकवाड, शिवकुमार बैलकवाड, दीपक जमदाडे, शुदोधन लांडगे,बाळासाहेब दुधारे यांच्यासह मोठ्या संख्येने दलित मुस्लिम व ओबीसी मतदार उपस्थित होते.

# मशाल ही क्रांतीची नव्हे,तर घरे जाळण्यासाठी घेतली आहे-मुख्यमंत्री शिंदे

**वैजापूर । प्रतिनिधी**

दि. ११ नोव्हेंबर रोजी वैजापूर येथील आमदार रमेश बोरणारे यांच्या प्रचारसभेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शक्तीशाली भाषण केले. त्यांनी विरोधकांना घेरताना, मशाल हे चिन्ह क्रांतीसाठी नव्हे, तर लोकांची घरे जाळण्यासाठी वापरले जात असल्याचे वक्तव्य केले.

मुख्यमंत्री शिंदे यांचे म्हणणे होते की, विरोधक हे केवळ बोरणारे सर यांचे काम पाहून बोलतात. त्यांना फक्त खालच्या पातळीवर बोलता येते, गद्दाराची भाषा वापरली जाते, पण गद्दार कोण हे त्यांना समजत नाही. ते पुढे म्हणाले की, आमदार बोरणारे यांनी जातीपातीचे राजकारण न करता सर्वसमावेशक विकास केला आहे. त्यांच्या कामांची तारीफ करतांना विरोधकांना हे दिसत नाही.

माजी आमदार भाऊसाहेब तात्याची चिकटगावकर यांनी आदित्य ठाकरे यांच्या शिऊर येथील सभेबद्दल सांगितले की, आदित्य ठाकरे यांना त्यांच्या आराध्य दैवत श्री शंकर स्वामी आणि बहिणाबाई यांच्या मंदिरात जाऊन दर्शन घ्यायला वेळ मिळाला नाही, पण ते म्हणतात की बोरणारे सर जातीपातीचे राजकारण करत आहेत.मुख्यमंत्री शिंदे यांनी वैजापूरमधील ३००० कोटी रुपयांच्या विकासकामांचा उल्लेख केला आणि आगामी योजनांची माहिती दिली. त्यांनी रामकृष्ण गोदावरी जलसिंचन योजना व दहेगाव प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आम्ही जो जाहीरनामा तयार केला, तो विरोधकांनी आमच्यापासून चोरून घेतला आहे. आम्ही लाडकी बहीण योजना आणली, आता ते महालक्ष्मी योजना सांगत आहेत. त्यांच्या वचनांवर विश्वास ठेवा, ते महाराष्ट्राचा विकास कसा करणार?मुख्यमंत्री शिंदे यांनी परत एकदा विरोधकांवर हल्ला करत, मशाल या चिन्हाचा वापर क्रांतीसाठी नव्हे, तर घरे जाळण्यासाठी करण्यात आल्याचे प्रतिपादन केले. विरोधकांना त्यांच्या कामाचे उत्तर देत मुख्यमंत्री शिंदे यांनी आगामी निवडणुकीसाठी जनतेला विश्वास देताना, आम्ही केलेल्या कामांची जाणीव तुम्हाला २३ तारखेला होईल आणि तुम्हाला सक्षम उमेदवार कोण हे कळेल, असे सांगितले.

# प्रत्येक बालकाने व्यसनापासून दूर राहावे -तत्त्वशील कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

बाल दिनाच्या निमित्ताने सेन्ट अन्स इंग्लिश स्कूल बीड या ठिकाणी बालकांसाठी व्यसनमुक्तीपर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड तत्त्वशील कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड प्रा. मिथुन जोगदंड संविधान दूत बीड आदींची प्रमुख उपस्थिती होती



जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीड व नशाबंदी मंडळ बीड व राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बाल दिनानिमित्त बालकांनी व्यसनापासून दूर राहावे याकरिता व्यसनमुक्तीपर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन सेन्ट अन्स स्कूल बीड या ठिकाणी करण्यात आले होते यावेळी व्यसनमुक्तीपर पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तत्वशील कांबळे म्हणाले की लहान वयामध्येच मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे व्यसन जडत आहेत मोठ्यांचे अनुकरण लहान मुले बालके लवकर करतात त्यामुळे मोठ्यांनीही आपल्या बालकांकडे लक्ष ठेवावे व आपला बालक याला कोणते व्यसन लागू नये याकरिता सतत प्रयत्नशील राहावे तंबाखू गुटखा व इतर अमली पदार्थ यासोबतच मोबाईल याचेही मोठ्या प्रमाणात व्यसन जडत आहे त्याकरिता आत्तापासूनच बालकांना समुपदेशन करून व व्यसनाचे दुष्परिणाम सांगून सर्व बालकांना व्यसनापासून दूर कसे ठेवता येईल यासाठी आपण, शाळा, पालक व समाजातील घटकांनी सतत प्रयत्नशील राहायला हवे.यावेळी तांगडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की प्रत्येक बालक हा महत्त्वपूर्ण आहे बालकांनी व्यसनाकडे न वळता शिक्षणावर आपले लक्ष केंद्रित करावे जेणेकरून आपले शारीरिक मानसिक आरोग्य चांगले राहील व आपण आपल्या देशाची एक नवीन पिढी सुदृढ होईल या दृष्टीने आपण सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

यावेळी जोगदंड यांनी बालकांना मानसिक आरोग्य या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले सकाळी लवकर उठणे व्यायाम करणे रात्री लवकर झोपणे आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी मध्ये जंक फूड चा समावेश न करणे पालेभाज्या फळे दूध इत्यादीचे सेवन करणे हे शरीरासाठी खूप लाभदायक असते ते सर्व मुलांनी याचे पालन करावे असे त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या प्राचार्य शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# आ.कानडे यांना तीन हजार कोटी रुपयांचा निधी देणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. श्रीरामपूर राहुरी मतदारसंघात लहू कानडे विजयी होतील. त्यांनी गत पाच वर्षांत १२०० कोटींची कामे केली होती. पुढील काळात त्यांना ३ हजार कोटी रुपये देऊ अशी ग्वाही, राज्याचे उमुख्यमंत्री अजित पवार यांनी देत श्रीरामपूरला गत वैभव प्राप्त करून देण्याचा वादा पवार यांनी दिला. महायुतीचे उमेदवार आ. लहू कानडे यांची उमेदवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी स्वतः निश्चित केली होती. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचीही सहमती घेतली, अशी माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.



आ. लहू कानडे यांच्या प्रचारार्थ शहरातील थत्ते मैदान येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेत श्री. पवार बोलत होते. पक्षाचे राष्ट्रीय सचिव व प्रवक्ते अविनाश आदिक. माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक. देवळाली नगरपालिकेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम., श्रीरामपूर तालुका देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रनाथ पाटील थोरात. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार. प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक. तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे. भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे. अमृत काका धुमाळ. राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सचिव फारुख पटेल. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मिस्टर शेलार. सदस्य शरद नवले. बाजार समितीचे माजी सभापती नानासाहेब पवार. उपसभापती अभिषेक खंडागळे,, माजी नगरसेवक रवींद्र गुलाटी, राजेश अलघ, राजेंद्र पवार, प्रकाश ढोकणे, सलीम शेख, मोहम्मद शेख, मुख्तार शहा, मेहबूब कुरेशी, भाऊसाहेब मुळे, जितेंद्र छाजेड, विजय शेळके, रवी पाटील, अल्तमश पटेल, मल्लू शिंदे, माजी नगरसेविका अर्चना पानसरे, स्नेहल खोरे, संगीता शेळके, आदिवासी संघटनेचे शिवाजी गांगुर्डे, रिपब्लिकन पक्षाचे सुरेंद्र थोरात, भीमा बागुल, सुभाष त्रिभुवन, उद्योजक अंकुश कानडे, आदींसह मान्यवर उपस्थित होते माजी नगरसेविका जयश्री शेळके विजय शेळके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश केला.अजित पवार म्हणाले, आपण शिव,शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा मानतो. किमान कार्यक्रमावर महायुतीतील तीनही पक्ष सोबत आहोत. लाडक्या बहिणींना मदतीचा निर्णय घेतला. त्यावर विरोधकांनी तिजोरी खाली झाल्याची टीका केली. बहिणींना दिलेली दिवाळीची भेट पुढची पाच वर्षे सुरू राहणार आहे. आ. कानडे हे उच्च शिक्षित आहेत. त्यांची पत्नी, मुलगा, मुली हे यशस्वी कारकीर्द गाजवत आहेत. प्रशासकीय सेवेचा त्यांना दांडगा अनुभव आहे. हागणदारी मुक्त गाव योजनेचे ते जनक आहेत. अतिशय बिकट आर्थिक स्थितीतून पुढे आलेला हा संवेदनशील लेखक आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने कानडे यांची उमेदवारी कापली. मात्र या उमद्या कार्यकर्त्याच्या मागे मी भक्कमपणे उभा राहिलो.श्रीरामपूर मतदारसंघात देवळाली प्रवरा हे माझे आजोळ आहे. श्रीरामपूरला लहानपणी चित्रपट पहायला यायचो. येथील आर्थिक सुबत्ता जवळून अनुभवली आहे. महायुतीच्या सरकारमध्ये लहू कानडे यांच्या माध्यमातून श्रीरामपूरला गतवैभव प्राप्त करून देण्याचे वचन पवार यांनी दिले.लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षे सुरू राहणार आहे. महायुती सरकारला लाडक्या बहिणींची काळजी आहे. योजनेत भरीव वाढ करणार आहे, अशी ग्वाही अजित पवार यांनी दिली-महायुतीचे भाऊसाहेब कांबळे यांच्यासाठी आयोजित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा मी रद्द केली. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी स्वतः कानडे यांची उमेदवारी निश्चित केली. कांबळे हे आजारी वगैरे नसून ते ढोंग करत आहेत. मुख्यमंत्र्यांच्याच सभेसाठी उभारण्यात आलेल्या मंडपात आज सभा होते, महायुतीकडून मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्त्यांना स्पष्ट आदेश आहेत. यावरून सर्व काही स्पष्ट होते. कानडे हेच अधिकृत उमेदवार असून त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले. असे अजित पवार म्हणाले.आ. कानडे म्हणाले, पाच वर्षापूर्वी काँग्रेसला उमेदवार नसल्याने त्यांनी उमेदवाराची गळ घातली. मायबाप जनतेने विश्वास दाखवून मला आमदार केले. ती जबाबदारी समजून आपण राजकीय गट गट. पक्ष असा भेदभाव न करता विकास कामांसाठी निधी दिला. तालुक्यात बाराशे कोटी रुपयांची विकास कामे केली. परंतु कपट कारस्थान करून आपली उमेदवारी नाकारण्यात आली. त्यानंतर अजित पवार यांनी संपर्क करून मुंबईला बोलावले. दुसरा फोन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा आला. श्री. पवार यांनी मुख्यमंत्री अमित शहा, श्री. विखे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची चर्चा करून आपल्याला उमेदवारी दिली. माजी आमदार चंद्रशेखर कदम व नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी मेळावा घेऊन पाठिंबा दिला. रिपब्लिकन पक्षाचे नेते खासदार रामदास आठवले यांनीही पाठिंबा दिला. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याचे मी मानतो, असे ते म्हणाले.यावेळी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे, अमृत काका धुमाळ, देवळालीचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, माजी नगरसेवक राजेंद्र पवार, फारूक पटेल यांची भाषणे झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य कार्यकारणी सदस्य सुनील थोरात, शहराध्यक्ष अभिजीत लिप्टे, संदीप चोरगे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष साजिद मिर्झा, सैफ शेख, भाजपाचे विधानसभा समन्वयक नितीन दिनकर, केतन खोरे, गणेश राठी, मारुती बिंगले, गिरीधर आसने, गणेश मुद्गुले, बाबासाहेब चिडे, नानासाहेब शिंदे, राधाकृष्ण आहेर, भाऊसाहेब बांद्रे, अजित चव्हाण, सुधीर टिक्कल, शहाजी कदम, रमेश घुले, पी. एस. निकम, रवी गायकवाड, सचिन ब्राह्मणे, सागर कुऱ्हाडे, संपत चितळकर, चांगदेव देवराय, योगेश जाधव, अशोक गागरे, शामराव निमसे, कोंडीराम विटनोर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष मंदाताई गवारे, सरपंच मंजुश्री ढोकचौळे, पुष्पलता हरदास, रमा धिवर, मनीषा थोरात, सीमा पटारे, सतीश बोर्डे, सचिन जगताप, सरपंच अशोक भोसले, सागर मुठे, हरिभाऊ बनसोडे, आबा पवार, सुरेश पवार, राजेंद्र औताडे, रमेश आव्हाड, दीपक कदम, राधाकृष्ण तांबे, अक्षय नाईक यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष यांच्यासह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजची सभा मनसे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी गाजवली

## राज ठाकरे यांनी जनतेला फोनद्वारे केले संबोधीत




**केज । सचिन भालेराव**

दिनांक १४ नोव्हेंबर रोजी केज येथे राज ठाकरे यांची जाहीर सभा होती पण हेलिकॉप्टर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे सभेला उपस्थीत राहु शकले नाहीत तरी पण त्यांनी जनतेला फोन कॉल द्वारे संबोधित केले व म्हणाले की,काही तांत्रिक कारणा मुळे मी सभेला येऊ शकलो नाही तरी आमचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना विजयाचा गुलाल लावा नंतर आम्ही केज मध्ये येऊन तुमची भेट घेणार आहे तसेच केज विधानसभा मतदार संघाच्या विकासात काही कमी पडू देणार नाही राज साहेब ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने मनसे सैनिक उपस्थित होते.यावेळी रमेश तात्या गालफाडे यांनी जनतेला संबोधन केले व म्हणाले की आज पर्यंत केज विधानसभेचा विकास विरोधकांनी काहीच केलेला नसून मला एकदा संधी द्या केजचा विकास करूनच दाखवितो. विरोधी पक्षाच्या दोन्ही आमदाराने कमिशन खाऊन जनतेची फसवणूक केलीआहे व एकही उद्योगधंदा आणलेला नाही. बेरोजगारी वाढली असुन कॉलेज संस्था आणल्या नाहीत, शेतकऱ्यांना वीज नाही,पाणी नाही अशा मूलभूत सुविधा सुद्धा उपलब्ध नाहीत मी गेली वीस वर्षे जनतेची सेवा करत आहे मी सर्व सामान्य कार्यकर्ता असून असून राज साहेबांनी माझ्यावर जनतेची सेवा करण्यासाठी मला उभे केले आहे तरी मला एकदा संधी देऊन पहा मी या केज विधानसभेच्या कायापालट करुन दाखवणार आहे.बेरोजगारांना काम, शेतकऱ्यांच्या मालाला दाम मिळवून देणे ही माझी प्राथमिकता राहील विरोधकांनी हिंमत असेल तर मीडिया समोर येऊन जनतेला विकास काय केला आहे हे सांगावे. विरोधकांनी गुत्तेदारां कडुन कमिशन खाऊन स्वतःची घरे भरली आहेत फक्त मला आणि राज साहेब ठाकरे यांना शेतकऱ्यांसाठी, बेरोजगारांसाठी खूप काही करायचे आहे याची ब्ल्यू प्रिंट आम्ही तयार केली असून जनतेने आम्हाला एकदा संधी देऊन पहावी असे आवाहन त्यांनी जनतेला केले.त्याच बरोबर अर्चनाताई भोर यांनी सुद्धा सभेला आलेल्या जनतेला संबोधित केले जनतेचे मने जिंकले.जिल्हाध्यक्ष सुमंत धस,उपाध्यक्ष कल्याण केदार यांनी जनतेला आवाहन केले की,रमेश तात्या गालफाडे यांना प्रचंड बहुमतीने विजयी करा व महाराष्ट्र नवनिर्माणसेनेचा भगवा फडकवा मग आम्ही विकास करूनच दाखवितो असे त्यांनी सांगुन मनसे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना प्रचंड बहुमताने निवडूनआणण्या साठी सर्वांनी मतदानरुपी आशिर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

# ह.भ.प.चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचा वारकरी पुरस्काराने सन्मान

**केज । प्रतिनिधी**

वैकुंठवासी ह. भ. प. चैतन्य सद्गुरु तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा वारकरी पुरस्कार ह. भ. प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांना प्रदान करण्यात आला. यावर्षीचा हा २७ वा वारकरी पुरस्कार असून तो कार्तिक शुद्ध द्वादशी बुधवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी वासकर वाडा, काळा मारुती मंदिरामागे, संत पेठ, पंढरपूर येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.
याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह. भ. प. विठ्ठल वासकर महाराज होते. २६ वा पुरस्कार देहू येथे गाथा मंदिर निर्माण करणारे ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले यांना प्रदान करण्यात आला होता. त्यांच्या शुभ हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप शाल, हार, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व २१ हजाराचा श्रद्धानिधी असे आहे. श्री संत गोरोबाकाका व चैतन्य सद्गुरु तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज प्रतिष्ठान, श्रीक्षेत्र वाणेवाडी, तालुका जिल्हा धाराशिव तसेच श्री संत सेवा संघ, सातारा व श्री



ज्ञानराज प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. चैतन्य सद्गुरु तात्यासाहेब बाबासाहेब वासकर यांच्या वैकुंठ गमनानंतर त्यांच्या स्मरणार्थ १९९८ पासून हा पुरस्कार ह. भ. प. विठ्ठल दादा वासकर महाराज यांच्या नियोजनातून सुरू करण्यात आला आहे. १९९८ ला पहिला पुरस्कार ह. भ. प. बाबा महाराज सातारकर यांना प्रदान करण्यात आला होता. तेव्हापासून त्याच तोलामोलाच्या व्यक्तिमत्वांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो आहे. व्यासपीठावरील मान्यवर ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले, ह. भ. प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर व कार्यक्रमाचे अध्यक्ष ह. भ. प. विठ्ठल महाराज वासकर यांच्या शुभहस्ते आबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. 'तुम्ही संत मायबाप कृपावंत' या ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत संयोजन समितीतील सदस्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेवनसिद्ध लामतुरे यांनी केले. नंतर संयोजन समितीच्या वतीने ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले व कार्यक्रमाचे अध्यक्ष ह. भ. प. विठ्ठल वासकर महाराज यांच्या शुभहस्ते ह. भ. प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तत्पूर्वी त्यांना दिल्या जाणाऱ्या सन्मानपत्राचे वाचन ह. भ. प. प्रमोद महाराज जगताप यांनी केले.
पांडुरंगाच्या वतीने ह. भ. प. शंकर महाराज बडवे यांनी पांडुरंगाचे आशीर्वाद प्रदान केले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, महाराष्ट्र ही नररत्नांची खाण असल्यामुळे याहीपुढे पुरस्कार प्राप्त करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. समस्त वारकरी फडकरी यांच्या वतीने आशीर्वाद प्रदान करण्यासाठी ह. भ. प. प्रभाकर महाराज बोधले व विठ्ठलरुक्मिणी मंदिर समितीचे विश्वस्त व वारकरी फडकरी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी आशीर्वाद प्रदान केले.
पुरस्काराला उत्तर देताना ह. भ. प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांनी आबांच्या आठवणींना उजाळा दिला. २०७ वर्षांपासून वासकरांचा व देगलूरकर यांचा अव्याहत संबंध प्रस्थापित असून तेव्हापासून त्यांची कीर्तनसेवा आमच्या फडावर चालू असल्याचे सांगितले. आबांच्या आठवणींना उजाळा देत असताना समस्त वारकऱ्यांच्या बरोबरच विठ्ठल वासकर महाराज सुद्धा भावनिक झाले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.
कार्यक्रमासाठी संयोजन समितीतील रेवणसिद्ध लामतुरे, पांडुरंग मन्मथ उंबरे, महादेव मारुती गाढवे, शेषराव नामदेव पौळ, रामचंद्र एकनाथआप्पा उंबरे, भागवत लिंबराज घेवारे, अक्षय चंद्रकांत भोसले, सोनोपंत घाडगे, प्रमोद महाराज जगताप, मदन विष्णुपंत कदम, श्रीपती चंद्रू माने, शशिकांत काटे, शिवाजी सुदाम सुळके, प्रवीण जयवंत शेलार, कृष्णा शिवराम खंडागळे, पंढरी रामचंद्र केसकर यांच्यासह चवरे महाराज, अंबऋषी देगलूरकर महाराज तसेच अनेक नामवंत महाराज मंडळी व वारकरी यांची उपस्थिती होती.

## साडेपाच लाखांची रोकड घेऊन जाणाऱ्या दुचाकीस्वारास पकडले

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

खुलताबाद सुलतानपूर येथे बुधवारी दुचाकीवर जप्त करण्यात आलेली रक्कम तहसील कार्यालयातील लेखा कोषागार विभागात जमा करण्यात आली. त्यानंतर सदरील तरुणास जमा रकमेबाबत प्रमाणपत्र देताना आचारसंहिता पथकातील शशिकांत ससाणे व इतर.
खुलताबाद : साडेपाच
लाखांची रोकड घेऊन जाणाऱ्या दुचाकीस्वारास खुलताबाद पोलिसांच्या पथकाने पकडले. खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथे १३ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता ही कारवाई करण्यात आली. फुलंब्रीकडून खुलताबादकडे येणाऱ्या सैफ रउफ पटेल या तरुण दुचाकीस्वारास संशयावरुन खुलताबाद पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय फराटे व त्यांच्या पथकाने थांबवून त्याची विचारपूस केली. यावेळी त्याने दुचाकीवर समोरील बाजूस ठेवलेल्या बॅगेत साडेपाच लाखांची रोकड सापडली,
याबाबत त्याच्याकडे जागेवर काहीही पुरावा न आढळल्याने ही रक्कम लेखा कोषागार विभागात जमा करण्यात आली. या प्रकरणी आचारसंहितेअंतर्गत असलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकाचे राजेंद्र ठेंगडे यांच्यासह राहुल खिसवे, प्रदीप गायकवाड यांनी पुढील कारवाई केली.

## शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश




**उरण । विठ्ठल ममताबादे**

शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला.
बोरगाव आंबेवाडी गावातील शिवसेनेचे कार्यकर्ता नंदू नामदेव भस्मा, निलेश गंगाराम वीर, नितीन महादू भस्मा, एकनाथ दिगंबर मेंगाळ, विलास दगडू व्हला, प्रल्हाद देहू विर, भिकू मालू व्हाला, नागेश किसन भस्मा, किसन देवचंद भस्मा, प्रसाद गंगाराम विर, अशोक धाऊ पारधी, कुमार महादू भस्मा, हेमंत दिपक भस्मा यांनी प्रितमदादांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला.

## आश्लेषा बागडेने कुस्ती स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक


**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळ्यातील विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील खेळाडू कु. आश्लेषा बागडे हिने ५७ किलो वजन गटात सुवर्णपदकाची कमाई केली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या वतीने इंदापूर येथे ८ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत आश्लेषा बागडे हिने कोल्हापूरच्या पूजा पाटीलवर अंतिम सामन्यात चितपट विजय मिळवून गोल्ड मेडल पटकावले.
या यशात प्रा. राम काळे यांच्या मार्गदर्शनाचे महत्त्वाचे योगदान लाभले. यशाबद्दल संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील,



वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

## रमेश आडसकर यांना रिपाई एकतावादीचा जाहीर पाठिंबा-शैलेंद्र पोटभरे



**बीड ।प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघातील अपक्ष उमेदवार रमेश बाबुराव आडसकर यांना रिपाई एकतावादीचा जाहीर पाठिंबा शैलेंद्र पोटभरे जाहीर केला आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये समाजाच्या मूलभूत प्रलंबित प्रश्नावर रिपाई एकतावादी जाहीर पाठिंबा देत असून माजलगाव मतदार संघातील अपक्ष उमेदवार रमेशआडसकर हे सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नाची जाण असणारे उमेदवार आहेत यांच्या विजयासाठी सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आव्हान शैलेंद्र पोटभरे यांनी केले.

## तरुणाच्या सतर्कतेमुळे वाचले जखमी हरीणाचे प्राण



**गौतम बचुटे । केज**

केज येथे कुत्र्याच्या हल्यात जखमी झालेल्या हरीनाचे प्राण पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचले आहेत.दि. १३ नोव्हेंबर रोजी अंबाजोगाई तालुक्यातील धायगुडा पिंपळा येथील तळ्याचे शेत शिवारात रतन बचुटे, त्यांची पत्नी महानंदा बचुटे आणि मुलगा अमोल बचुटे व अरविंद गोरे हे त्यांच्या शेतात काम करीत असताना त्यांना शेजारी जखमी हरिण आढळून आले. त्यांनी ही माहिती तात्काळ त्यांचे पत्रकार नातेवाईकांना दिली. पत्रकारांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्याचे हेडकॉन्स्टेबल मंगेश भोले आणि धारूर येथील वन वाचिष्ट भालेराव शाम गायसमुद्रे यांच्याशी संपर्क साधल्या नंतर त्यांनी अंबाजोगाई वनविभागाचे गित्ते आणि शिंगटे मॅडम यांच्याशी संपर्क साधून त्यांना माहिती दिली.
माहिती मिळताच वनपाल शिंगटे मॅडम, वनसेवक विष्णू शेप, भगवान शेप यांनी सरकारी वाहनाने धायगुडा पिंपळा येथील शेतात जावून जखमी हरिनाला ताब्यात घेतले. जखमी हरिणावर पशुवैद्यकीय डॉक्टर मार्फत उपचार करण्यात येणार आहेत.दरम्यान अमोल बचुटे आणि अरविंद गोरे यांच्या दक्षते मुळे आणि वान विभागातील दक्ष कर्मचाऱ्यांमुळे जखमी हरीणाचे प्राण वाचू शकले.

## जिवाची वाडी येथे भव्ययात्रा व कुस्तीचा सामना

**येवता । प्रतिनिधी**

दि१३रोजी केज तालुक्यातील जिवाची वाडी येथे शुक्रवारी माहुरची आई(रेणूका) माता देवीची भव्य यात्रा, पालखीची मिरवणूक शोभेची विविध रंगेची मजे मजेची दारू उडवीली जाईल, करमूणीसाठी लोकनाट्य तमाशा मंडळा कार्यक्रम दाखविला जाईल व शनिवारी जंगी कुस्त्याचा सामना होणार असुन योग्य बक्षीस दिले जाणार आहे.पंचकुशीत भावीक व पैलवान यांनी लाभघ्यावा असे गावकरी मंडळ जिवाची वाडी यांनी कळविले आहे.
टिप:केज -जिवाची वाडी एस टी बस सकाळी ९:०० आणि संध्याकाळी ६:०० मुक्कामी बससेवा चालु आहे. व खाजगी वाहाने पण चालु आहेत.

## जगन्नाथ गिरी यांचे निधन



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील पैठण येथील रहिवासी जगन्नाथ भागवत गिरी वय ५२ वर्ष यांना मंगळवार रोजी अज्ञात वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिली होती या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते .अंबाजोगाई येथील स्व रा ती रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.
त्यांच्यावर पैठण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.आई ,पत्नी,दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. धार्मिक कार्यक्रमात अग्रेसर असणारे देवबप्पा म्हणून ते सर्व परिचित होते. निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आपण मंजूर केलेल्या २०६ कोटी रूपयांच्या योजनेतून अंबाजोगाईचा पाणी प्रश्न कायम स्वरूपी सुटणार-नमिता मुंदडा

### शहरातील लालनगर भागात शेकडो महिला, युवती आणि नागरिकांनी दिला नमितातार्ईंना आशिर्वाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नातं विकासाचं काम विश्वासाचं हे ब्रिद घेवून माजी आ. नमितातार्ई मुंदडा यांनी मागील पाच वर्षात केलेलं विकास काम यामुळे त्यांचा जनमाणसामध्ये विकासप्रिय आमदार असा ठसा उमटला आहे. सध्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मुंदडा यांना जनतेचा दिवसेंदिवस पाठींबा वाढत आहे. विविध समाज घटक नमितातार्ईंच्या विजयासाठी सरसावले आहेत. मंगळवारी सायंकाळी शहरातील लाल नगर भागात शेकडो महिला, युवती आणि नागरिकांनी नमितातार्ई मुंदडा यांना सक्रिय पाठींबा दर्शवत विजयासाठी आशिर्वाद दिले.
अंबाजोगाई शहरातील लालनगर येथे महिला-भगिनी



यांनी आयोजित केलेल्या संवाद बैठकीस माजी आ. नमिता मुंदडा या उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित सर्वांशी त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. तसेच होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत माझ्या पाठीशी राहत मला मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत, अशी नम्र विनंती केली. या प्रसंगी मतदार बंधू-भगिनी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. नातं विकासाचं काम विश्वासाचं हे ब्रिद घेवून आपण मागील पाच वर्षे काम केलं आहे. त्याची पावती जनता आशिर्वाद रूपाने देणार आहे.
आपण धनेगाव धरणातून अंबाजोगाई शहराला होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेचे अधिक विस्तार करण्यासाठी २०६ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर केली असून या योजनेचे प्रत्यक्ष काम प्रगतीपथावर आहे. ही योजना प्रत्यक्ष कार्यरत झाल्यानंतर, अंबाजोगाई शहरातील नागरिकांची पाणीटंचाई पासून कायमची सुटका होणार आहे. अंबाजोगाई शहराच्या पाणीपुरवठा योजना विस्तारीकरणाची माहिती देणारी संक्षिप्त चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. यावेळी लाल नगर भागातील सामाजिक कार्यकर्ते आकाश वेडे, माजी नगरसेवक संतोष शिनगारे, शरीफ शेख, चंद्रकांत बनसोडे, अमर ससाने, रामदास घाडगे, प्रशांत घाडगे, शंकर एडके, युसुफ शेख, सुनिल थोरात, जफर शेख, अफसर शेख, संगीता पौळे, कलाबाई पौळे, परवीन सय्यद, वंदना घाडगे, ललिता कांबळे, वंदना कांबळे, कालिंदाबाई सरवदे, जमुनाबाई वाघमारे, सुनिला वेडे, शालुबाई मस्के आदींसह ज्येष्ठ नागरिक, महिला, युवती, युवक यांच्यासह भाजपा, महायुती घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077